जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

07 JAN 2017

तरुण भारत

# प्रसारमाध्यमांमध्ये संधीबरोबर आव्हानेही

## संपादक परिषदेत उमटला सूर : पत्रकार दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात विचारमंथन

प्रतिनिधी
कोल्हापूर

पत्रकारिता आणि देशातले, समाजातले वास्तव हे कधीच वेगळे करता येत नाही. या वास्तवाची जाणीव असणारे, सर्वंकष परिस्थितीचा अभ्यास व आवाका असणारे अथवा तो निर्माण करण्याची गुणवत्ता असणारे पत्रकारितेच्या क्षेत्रात टिकून राहतील. पारंपरिक माध्यमांसमोर नवमाध्यमांमध्ये मोठे आव्हान असले तरी माध्यमांचा हा विस्तार आणखी गतीने होणार असून, त्यात अनेक संधींबरोबर आव्हानेही दडलेली आहेत, असा सूर शिवाजी विद्यापीठात आयोजित 'संपादक परिषदे'तून व्यक्त झाला. ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर अध्यक्षस्थानी होते.



**कोल्हापूर : संपादक परिषदेत बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. व्यासपीठावर (डावीकडून) 'तरुण भारत'चे निवासी संपादक जयसिंग पाटील, ज्येष्ठ संपादक वसंत भोसले व श्रीराम पवार.**

शिवाजी विद्यापीठाचा वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभाग, एमए मास कम्युनिकेशन विभाग, विभागीय तसेच जिल्हा माहिती कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार दिनानिमित्त संपादक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये 'तरुण भारत'चे निवासी संपादक जयसिंग पाटील, 'सकाळ' समूहाचे मुख्य संपादक श्रीराम पवार, 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले, 'बी न्यूज'चे संपादक चारुदत्त जोशी आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कोल्हापूर विभागाचे उपसंचालक (माहिती) सतीश लळित सहभागी झाले होते.

'तरुण भारत'चे निवासी संपादक जयसिंग पाटील म्हणाले, पत्रकारितेच्या क्षेत्रात मनुष्यबळाचा ओघ दिसत असला तरी दर्जेदार मनुष्यबळाचा प्रश्न माध्यम क्षेत्राला मोठ्या प्रमाणात भेडसावतो आहे. शब्ददारिद्र्य, संवेदनहीनता आणि भावनाशून्यता या दुष्टचक्रात पत्रकारिता अडकू पाहते आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. अधिविभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले.

- 7 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

संपादक परिषदेमधील सूर : शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागाचा कार्यक्रम

# पत्रकारांनी आव्हानांना सामोरे जावे

कोल्हापूर : पत्रकारितेतील संधी साधण्यासह आव्हाने पेलण्यासाठी सखोल अभ्यास आणि पक्की वैचारिक बैठक आवश्यक आहे. सोशल मीडिया आणि तंत्रज्ञानाचा विस्तार वेगाने होत असून, त्यानुसार सामाजिक बदल होत आहे. हे बदल माध्यमांनी अंगीकारणे आवश्यक आहे, असा सूर शिवाजी विद्यापीठातील संपादक परिषदेमध्ये शुक्रवारी व्यक्त झाला.

विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभाग, मास कम्युनिकेशन आणि विभागीय व जिल्हा माहिती कार्यालयातर्फे पत्रकार दिनानिमित्त हा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यामध्ये 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले, विभागीय माहिती उपसंचालक सतीश लळित, 'सकाळ'चे मुख्य संपादक श्रीराम पवार, 'तरुण भारत'चे निवासी संपादक जयसिंग पाटील, 'बी न्यूज'चे संपादक चारुदत्त जोशी यांनी सहभाग घेतला. अर्थशास्त्र विभागाच्या सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, तर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे प्रमुख उपस्थित होते. त्यात 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले म्हणाले, आजची नवी पिढी सजग आणि जगाशी संबंधित असल्याने त्यादृष्टीने माध्यमांनी विषय स्वीकारून आशयसमृद्ध मांडणी केली पाहिजे. प्रत्येक माहितीत नवीन विचार, नवा आशय असायला हवा. पारंपरिक माध्यमांसमोर नवमाध्यमांचे मोठे आव्हान असले, तरी माध्यमांचा हा विस्तार सकारात्मक आहे. हा विस्तार आणखी गतीने होणार असून, त्यात अनेक संधी आणि आव्हाने दडलेली आहेत. या संधी साधण्यासह ती आव्हाने पेलण्यासाठी पत्रकारितेमध्ये येणाऱ्या युवा पिढीने सखोल अभ्यास, वैचारिक बैठक पक्की करावी. माहिती उपसंचालक सतीश लळित म्हणाले, सध्या देशाला विकास पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांची गरज आहे. ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर म्हणाले, बदलत्या काळानुसार पत्रकारिता, माहितीचे स्रोत, तंत्रज्ञान बदलले, तरी ज्ञानसंपादनाची गरज कायम राहणार आहे.

या कार्यक्रमास जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर, डॉ. राजेंद्र पारिजात, सुमेधा साळुंखे, श्रीहरी देशपांडे, रावसाहेब पुजारी, चंद्रशेखर वानखेडे, आदी उपस्थित होते. वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. शीतल काळे यांनी सूत्रसंचालन केले. संतोष चव्हाण यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

## सकारात्मक पत्रकारिता

कोल्हापूरची पत्रकारिता सकारात्मक आहे. येथील पत्रकार हे विचारमंच आहे. त्यांना समाजाच्या प्रश्नांची जाण असून, ते सोडविण्याची तळमळ असल्याचे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले. ते म्हणाले, नकारात्मक पत्रकारिता ही अल्पायुषी असते. एक विचार घेऊन पत्रकारिता होणे आवश्यक आहे. पत्रकारितेमधील सकारात्मकता आयुष्यभर जपावी.

दीपक जाधव



शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी पत्रकार दिनानिमित्त संपादक परिषद हा कार्यक्रम झाला. यावेळी डावीकडून चारुदत्त जोशी, जयसिंग पाटील, श्रीराम पवार, वसंत भोसले, दशरथ पारेकर, प्रा. डॉ. निशा पवार, वर्षा पाटोळे, आलोक जत्राटकर उपस्थित होते.



07 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# कंटेंट निर्माण करणाऱ्या पत्रकारांची गरज

## श्रीराम पवार : शिवाजी विद्यापीठात पत्रकार दिनानिमित्त संपादक परिषद

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : "वाचकांना, श्रोत्यांना, दर्शकांना हवे असलेले, सर्व प्रकारच्या गरजांनुरूप कंटेंट निर्माण करणारे पत्रकार माध्यम क्षेत्राला हवे आहेत. सिटिझन जर्नालिझम हे पत्रकारितेचे भवितव्य असून, पत्रकारितेचा प्रवास आता एडिटिंग ते क्युरेटिंग असा होणार आहे", असे मत सकाळ माध्यम समूहाचे मुख्य संपादक श्रीराम पवार यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचा वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभाग, एम.ए. मास कम्युनिकेशन विभाग आणि कोल्हापूरच्या विभागीय तसेच जिल्हा माहिती कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार दिनानिमित्त झालेल्या संपादक परिषदेत ते बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर अध्यक्षस्थानी होते.

श्री. पवार यांनी वृत्तपत्र क्षेत्रात मोठ्या गतीने सुरू असलेल्या बदलांचा वेध घेतला. ते म्हणाले, "पारंपरिक विचारांनुसार वृत्तपत्रांनी एखाद्या विषयाच्या सर्व बाजू द्याव्यात, असा आग्रह असतो. नकारात्मक. बातम्यांतही मूल्य असते, हे विसरता कामा नये. नवमाध्यमांच्या गतिमान आगमनामुळे यामधील ऑब्जेक्टिव्हिटी संपते आहे. सद्यःस्थितीत पत्रकारांनी विवेकपूर्ण भूमिका घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. ज्याचे अस्तित्व गुगलवर आहे, तोच जिवंत असे मानण्याचा हा कालखंड आहे. नवमाध्यमांमुळे माध्यमांकडे पाहण्याचा, ग्रहण करण्याचा दृष्टिकोन साफ बदलला आहे. बातमी ब्रेक करण्याचे सूत्र आता समाजमाध्यमांच्या हाती आले आहे.

तशात विध्वंसक तंत्रज्ञानामुळे (डिसरप्टिव्ह टेक्नॉलॉजी) जगण्याची सारी अंगे बदलून गेली आहेत. दाओस इथे झालेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये चौथ्या औद्योगिक क्रांतीबाबत भाष्य करण्यात आले. 'नेटवर्किंग ऑर नॉट वर्किंग' हे या क्रांतीचे सूत्र असणार आहे."

ज्येष्ठ पत्रकार वसंत भोसले, जयसिंग पाटील, चारुदत्त जोशी व माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कोल्हापूर विभागाचे उपसंचालक (माहिती) सतीश लळित यांनी मनोगत व्यक्त केले. अधिविभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. शीतल काळे यांनी सूत्रसंचालन केले. संतोष चव्हाण यांनी आभार मानले.

या प्रसंगी जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे, रावसाहेब पुजारी, डॉ. राजेंद्र पारिजात, डॉ. श्रीहरी देशपांडे, डॉ. सुमेधा साळुंखे उपस्थित होते.



श्रीराम पवार

### समृद्ध वारशाची पत्रकारांना जाणीव...

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, "कोल्हापूरची पत्रकारिता ही सकारात्मक दिशेने जाणारी आहे. कोल्हापूरला एक समृद्ध वारसा लाभला आहे. या वारशाची जाणीव असलेला इथला प्रत्येक पत्रकार हा एक स्वतंत्र विचारमंच आहे. ज्याला समाजाच्या प्रश्नांची जाण आहे. ते सोडविण्याची तळमळ आहे. ही सकारात्मकता त्यांनी सदोदित जोपासावी." नकारात्मक पत्रकारिता अल्पायुषी असल्याचेही त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- 7 JAN 2017

पुढारी

# व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधा : लोंढे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधणारे विद्यार्थीच यशोशिखर गाठू शकतात. त्यामुळे सर्वांगीण विकास साधण्यासाठी ज्ञान मिळवा म्हणजे मनुष्य जीवन सफल होईल. अभ्यास सगळेच परीक्षार्थी करतात; परंतु खरे ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न खूप कमी विद्यार्थी करत असल्याचे मत समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सेवा पूर्व मार्गदर्शन केंद्राच्या वतीने विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त 'स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना' या विषयावरील विशेष व्याख्यानात विशाल लोंढे बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

लोंढे म्हणाले, स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना विषयांचे सखोल ज्ञान घेणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी विविध स्पर्धा परीक्षा केंद्रांचे मार्गदर्शन घेण्यापेक्षा स्वत:ची एक विशिष्ट अभ्यास पद्धती निर्माण करून यश प्राप्त करणे शक्य आहे. विद्यार्थ्यांनी मनामध्ये ऊर्मी बाळगून ध्येयप्राप्तीसाठी कठोर परिश्रम घेतले पाहिजेत. उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य वापर करून जिद्दीने, चिकाटीने अभ्यास करावा. सजगतेने घेतलेला निर्णय व जलद कृतिशीलता विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी बनवते. आज महिला सर्वच क्षेत्रांत अग्रेसरपणे कार्यरत आहेत. आपल्या कार्यप्रणालीमध्ये आमूलाग्र बदल घडविण्यासाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेतला पाहिजे.

कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी जागतिक चालू घडामोडींचा अत्यंत काळजीपूर्वक अभ्यास करणे आवश्यक आहे. आजचा सुज्ञ विद्यार्थीच उद्याचा चांगला समाज निर्माण करू शकतो. सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सचिन कदम यांनी परिचय करून दिला. अमित कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. व्याख्यानास स्पर्धा परीक्षार्थींचा अत्यंत भरघोस प्रतिसाद लाभला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
-7 JAN 2017

पुढारी

**संक्षिप्त**



कोल्हापूर : व्याख्यानप्रसंगी बोलताना शरीरबोध संस्थेच्या अध्यक्षा राजश्री साकळे. व्यासपीठावर डॉ. पद्मजा पाटील, डॉ. एन. डी. पारेकर. (छाया : तय्यब अली)

# स्त्रियांनी निर्भयपणे अनिष्ट प्रवृत्तींना जाब विचारावा : राजश्री साकळे

**कोल्हापूर (प्रतिनिधी)** : लैंगिक छळ हा भांडवली व्यवस्थेचा भाग आहे, जिथे महिलांकडे उपभोगाची वस्तू म्हणून पाहिले जाते. स्त्रियांनी निर्भय होऊन अनिष्ट प्रवृत्तींना जाब विचारला पाहिजे, असे प्रतिपादन शरीरबोध संस्थेच्या अध्यक्षा राजश्री साकळे यांनी केले. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र व इतिहास अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ व प्रतिबंध' या विषयावर त्या व्याख्यानप्रसंगी बोलत होत्या. अध्यक्षस्थानी डॉ. पद्मजा पाटील होत्या. साकळे म्हणाल्या, कायद्याची अंमलबजावणी करताना महिलांच्या अधिकारांचे संरक्षण व संवर्धन करतो. पुरुषसत्ताक विचारसरणी व संस्कार प्रामुख्याने अशा अत्याचारांना कारणीभूत असतात. कायद्याच्या कठोर अंमलबजावणीसाठी जनजागृतीची गरज आहे. यावेळी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. एन. डी. पारेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एन. पी. देसाई यांनी स्वागत केले. अविनाश भाले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
-7 JAN 2017

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात दिनदर्शिकेचे प्रकाशन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाची सन २०१७ ची दैनंदिनी आणि दिनदर्शिकेचे प्रकाशन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात हा प्रकाशन समारंभ झाला.

यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, यंदाच्या दिनदर्शिकेसाठी 'विद्यापीठ परिसरात बहरलेली रानफुले' असा विषय घेऊन काम करण्यात आले. बारा निवडक छायाचित्रांचा त्यात समावेश करण्यात आला आहे. हीच छायाचित्रे दैनंदिनीमध्येही समाविष्ट करण्यात आली आहेत. अशा प्रकारे दोन्ही उपक्रम समान धाग्याने गुंफण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे.

या उपक्रमाबद्दल जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर यांनी माहिती दिली. यावेळी दिनदर्शिकेच्या निर्मितीत महत्त्वाचे योगदान देणारे विनोद शिंपले, मानसिंगराज निंबाळकर आणि मुद्रणालय अधीक्षक भूषण पाटील यांचा कुलगुरूंच्या हस्ते गौरव करण्यात आला. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढलेली छायाचित्रे हे यंदाच्या विद्यापीठ दैनंदिनीचे वैशिष्ट्य आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- 7 JAN 2017

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‌घाटन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागात ग्रास सिस्टेमेटिक या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‌घाटन भारतीय वनस्पती सर्वेक्षणाचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. पी. लक्ष्मीनरसिंम्हन यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. एस. एस. कांबळे होते. गवत, गवताचे प्रकार व वर्गीकरण याबाबत कार्यशाळेत माहिती देण्यात आली. ११ जानेवारीपर्यंत ही कार्यशाळा असून विविध मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेस विभागप्रमुख प्रा. डॉ. डी. के. गायकवाड, प्रा. डॉ. एस. आर. यादव, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

- 7 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

# नामविस्ताराचा अनाठायी वाद

## तज्ज्ञांच्या संशोधन आणि चर्चेनंतरच झाले शिवाजी विद्यापीठाचे नामकरण

**balasaheb.patil**
@timesgroup.com
Tweet : @balpatilMT

**कोल्हापूर :** 'नवे सरकार आणि कामगिरी दमदार' असल्याने सध्या कामांचा वेग वाढला आहे. नवे निर्णय होत आहेत. ज्या काही जुन्या संस्था, वास्तू, ठिकाणे आहेत त्यांचा नामविस्तार सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून अलीकडे शहरातील आमदार राजेश क्षीरसागर यांच्यासह काही हिंदुत्ववादी संघटनांनी शिवाजी विद्यापीठाचा 'छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ' असा नामविस्तार करावा अशी मागणी केली आहे. क्षीरसागर यांनी शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्याकडे निवेदही दिले आहे. मुळात तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, शिक्षणमंत्री बाळासाहेब देसाई आणि पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी संशोधन आणि चर्चेअंती विद्यापीठाचे नाव निश्चित केले होते. मात्र, बेगडी अस्मितेच्या राजकारणात शिवाजी महाराजांच्या नावाने असलेल्या या विद्यापीठाचा नामविस्तार नव्हे तर 'नामसंकोच' करण्याचा घाट घातला जात आहे.

ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाच्या वाटा सहजपणे धुंडाळता याव्यात. नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर कोल्हापुरात विद्यापीठाची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी तत्कालीन शिक्षणमंत्री बाळासाहेब देसाई यांनी सी. रा. तावडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीने आपला अहवाल सरकारला सादर केला आणि जुलै १९६१ मध्ये विद्यापीठाची घोषणा झाली. यावेळी विद्यापीठाच्या नावावरही खल झाला. काहींचे म्हणणे असे होते की, छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ असे असावे. तर काहींनी शिवाजी महाराज एकमेवद्वितीय आहेत. त्यामुळे त्यांच्या नावाचा अपभ्रंश किंवा नामसंकोच होण्याचा धोका आहे. यासाठी समितीतील अनेकांनी त्याला विरोध करत 'शिवाजी विद्यापीठ' असेच नाव द्यावे, असे सुचविले. यावर सरकारनेही चर्चा केली. सरकारने स्थापन केलेल्या समितीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बॅ. बाळासाहेब खर्डेकर, राजारामबापू पाटील, प्रा. ना. सी. फडके, डॉ. बी. एस. पाटील, डॉ. बी. आर.ढेकणे, डॉ. भगवान दास, डॉ. बी. एस. नाईक, प्राचार्य आर. एस. मगळी, व्ही. ए. आपटे यांचा समावेश होता. या समितीने देशभरातील मोठ्या विद्यापीठांना भेटी दिल्या. अनेक संस्थांच्या नावांचा अभ्यास केला. नामविस्तार आणि नामसंकोच याचा अभ्यास करून 'शिवाजी विद्यापीठ' हे नाव निश्चित केले. या नावावर ऐतिहासिक पन्हाळगडाच्या सज्जाकोठीत शिक्कामोर्तब करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाचे नाव एखाद्याला सुचले आणि लगेच दिले, असे झालेले नाही. महान इतिहाससंशोधक असलेल्या डॉ. आप्पासाहेब पवारांनी यावर संशोधन केले होते. देसाई आणि पवार यांच्यासह महाराष्ट्रातील विद्वान मंडळींच्या चर्चेतून देण्यात आलेले नाव सध्या काहींना निरुपयोगी आणि एकेरी वाटू लागले आहे. यावेळी या नावाबाबतचा इतिहास माहीत असलेले अनेकजण गप्प आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने असलेल्या या विद्यापीठाने केवळ नाव धारण केले नाही तर, डॉ. पवारांपासून ते डॉ. देवानंद शिंदे यांच्यापर्यंत कालखंडात इतिहास संशोधनावर भर दिला आहे. अनेक दुर्मिळ ग्रंथ प्रकाशित केले आहेत, अनेक अध्यासनांच्या माध्यमातून इतिहास संशोधनाचे काम सुरू आहे. काही वर्षांपूर्वी ना. ग. गोरे आणि एस. एम. जोशी यांनी नामविस्ताराबाबत विद्यापीठाकडे मागणी केली होती. मात्र, बॅ. पी. जी. पाटील यांनी यामागचा इतिहास सांगितल्यानंतर त्या दोघांनीही मोठ्या मनाने ते मान्य केले होते. त्यानंतर हा विषय संपला होता.

मध्यंतरी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाचा नामविस्तार केल्यानंतर अचानक ही जुनी मागणी पुढे आली आणि त्यासाठी शिक्षणमंत्री तावडे यांच्याकडे आमदार राजेश क्षीरसागर यांनी निवेदन दिले. त्यानंतर हिंदुत्ववादी संघटनांनी शिवाजी चौकात निदर्शने करून तातडीने निर्णय घेण्याची मागणीही केली. आता सरकारचा निर्णय घेण्याचा झपाटा असल्याने ते कदाचित हा निर्णय घेण्याची चूक होऊ शकते. महाराष्ट्रातील सर्वात मोठी टेक्निकल इन्स्टिट्यूट असलेली वीरमाता जिजाबाई टेक्निकल इन्स्टिट्यूटचा झालेला नामसंकोच (व्हीजेटीआय) हे आपल्यासमोर उदाहरण असतानाही त्याबाबत आग्रह धरला जात आहे. याशिवाय मुंबईतील शिवाजी महाराज टर्मिनसचा झालेला नामसंकोच हे आपल्यासमोर मोठे उदाहरण आहेच.



**मटा सिटीस्कॅन**

### शिक्षण

### जिजाऊंच्या नावे लोककेंद्र व्हावे

मध्यंतरी अखिल भारतीय मराठा महासंघ आणि महिला आघाडीने दीक्षान्त समारंभासाठी उभारण्यात आलेल्या हॉलला राजमाता जिजाऊ लोकविकास केंद्र असे नाव द्यावे अशी मागणी केली आहे. मात्र, त्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. याबाबत लोकप्रतिनिधींनी आग्रह धरावा.

### आप्पासाहेब पवारांचे नावही पुसण्याचा प्रयत्न

शिवाजी विद्यापीठाच्या शेजारी जुन्या पुणे बेंगळूरू महामार्गावर डॉ. आप्पासाहेब पवार चौक आहे. या चौकाचे नामकरण करण्यासाठी कोल्हापूर महानगरपालिकेच्या महासभेत दोनवेळा ठराव झाले आहेत. रस्ते विकास प्रकल्पात चौकाच्या नावाचा बोर्ड काढून पोस्टाच्या दारात लावण्यात आला होता. सध्या या चौकाचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. मात्र, या चौकाला स्वामी विवेकानंद आणि महात्मा बसवेश्वरांचे नाव देण्यासाठी काही संघटनांनी पुढाकार घेतला होता. त्यावरून अनाठायी वादही झाले. या चौकाला पुन्हा दुसरे नाव दिले नाही, पण डॉ. पवारांचे नाव असलेला फलकही तिथे लावला नाही. यावरून विद्यापीठाचा नवा इतिहासच लिहण्याचा जणू घाट घातला जात आहे.